22 FEB 2024 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'शिवस्पंदन'चा धडाक्यात प्रारंभ

## विद्यापीठात तीन दिवस महोत्सव; सुगम गायन, लोकवाद्य वादन रंगले

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २१ : ढोलताशांचा गजर, जल्लोषात निघालेली शोभायात्रा आणि तरुणाईचा सळसळता उत्साह अशा धडाक्यात आज शिवाजी विद्यापीठात तीन दिवसीय शिवस्पंदन महोत्सवाचा प्रारंभ झाला. उद्घाटनानंतर महोत्सवाच्या पहिल्या दिवशी सुगम गायन, एकल लोकवाद्य वादन आणि समूहगीत स्पर्धा रंगल्या. त्यात विद्यापीठ कॅम्पसवरील विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे दर्शन घडले.

विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभागातर्फे आयोजित या महोत्सवानिमित्त आयोजित शोभायात्रेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रमुख उपस्थित होते. विद्यापीठ प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य पुतळ्यापासून शिवस्पंदन महोत्सवाच्या उद्घाटनानिमित्त वि. स. खांडेकर भाषा भवनपर्यंत शोभायात्रा काढण्यात आली.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या शिवस्पंदन महोत्सवानिमित्त आयोजित शोभायात्रेच्या उद्घाटन प्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह अधिकारी, संयोजन समिती सदस्य आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'गतवर्षीपासून विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी 'शिवस्पंदन' महोत्सव सुरू करण्यात आला. त्याला अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यंदाही महोत्सव चांगल्या तऱ्हेने पार पडण्यासाठी पुढील तीन दिवस विद्यार्थ्यांनी आनंद, उत्साह आणि जल्लोष करीत असताना विद्यार्थ्यांनी शिस्तीचे पालनही कसोशीने करावे.' प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठाला कल्चरल पॉवरहाऊस बनविण्याचे धोरण आपण अंगिकारले आहे. त्यादृष्टीने शिवस्पंदनसारखा महोत्सव अत्यंत उपयुक्त ठरेल.' कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, 'विद्यार्थ्यांनी स्पर्धा म्हणून नव्हे, तर स्वानंदासाठी शिवस्पंदनमध्ये मनापासून सादरीकरण करावे, त्या सादरीकरणाशी सन्मयता साधून आपल्यातील कलागुणांचे योग्य प्रदर्शन करावे.'

यावेळी डॉ. प्रकाश गायकवाड, सागर डेळेकर, रामचंद्र पवार, नितीन कांबळे, मीना पोतदार, के.एम.गरडकर, आसावरी जाधव, प्रल्हाद माने, पांडुरंग पाटील, प्रतिभा देसाई, एस. टी. कोंबडे, व्ही. एस. खंडागळे, प्रमोद कसबे उपस्थित होते. महोत्सवाचे समन्वयक डॉ. नितीन कांबळे यांनी स्वागत केले. मीना पोतदार यांनी सूत्रसंचालन केले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड यांनी आभार मानले. महोत्सवात ४०० विद्यार्थी- विद्यार्थिनी सहभागी झाल्या आहेत.

### महोत्सवात आज

या महोत्सवात उद्या, गुरूवारी (दि. २२) मूकनाट्य, नकला आणि लघुनाटिका होतील. हे सर्व कार्यक्रम वि.स. खांडेकर भाषा भवन सभागृहात सकाळी १० वाजल्यापासून सादर होतील.

22 FEB 2024 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'शिवस्पंदन'मधून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवस्पंदन महोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्याचे काम करत असल्याचे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केले. शिवस्पंदन महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगानिमित्त आयोजित शोभायात्रेत ते बोलत होते. वि. स. खांडेकर भाषा भवनपर्यंत शोभायात्रा काढण्यात आली.

यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, गतवर्षीपासून विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी 'शिवस्पंदन' महोत्सव सुरू करण्यात आला. त्याला अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिवाजी विद्यापीठाच्या लौकिकास आपल्या वर्तनाने कोठेही बाधा येणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ येथे आयोजित शिवस्पंदन शोभायात्रेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. पी. एस. पाटील, व्ही. एन. शिंदे आदी. (छाया : पप्पू अत्तार)**

शिवाजी विद्यापीठाला कल्चरल पॉवर हाऊस बनविण्याचे धोरण आपण अंगिकारले आहे. त्यादृष्टीने शिवस्पंदनसारखा महोत्सव अत्यंत उपयुक्त ठरेल, असे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी सांगितले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, आपल्या कलागुणांना वाव देण्याच्या दृष्टीने असे महोत्सव खूप मोलाचे ठरत असतात. महोत्सवाचे समन्वयक डॉ. नितीन कांबळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

डॉ. मीना पोतदार यांनी सूत्रसंचालन केले, तर विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड यांनी आभार मानले. यावेळी महोत्सवात सहभागी झालेल्या ४०० विद्यार्थी-विद्यार्थिनींसह संयोजन समितीचे सदस्य उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 FEB 2024
तरुण भारत




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या शिवस्पंदन महोत्सवानिमित्त आयोजित शोभायात्रेच्या उद्घाटन प्रसंगी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह अधिकारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी.

# शिवस्पंदन महोत्सवाचे उद्घाटन

**प्रतिनिधी**
**कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने आयोजित तीन दिवसीय शिवस्पंदन महोत्सवानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारुढ पुतळ्यापासून वि. स. खांडेकर भाषा भवनापर्यंत ढोलताशांच्या गजरात मोठ्या जल्लोषाच्या वातावरणात शोभायात्रा काढण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते शोभायात्रेचे उद्घाटन करण्यात आले. वि. स. खांडेकर सभागृहातील महोत्सवाच्या अध्यक्षस्थानी बोलताना प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, गतवर्षीपासून विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी 'शिवस्पंदन' महोत्सव सुरू करण्यात आला. त्याला अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, प्रधानमंत्री उच्च शिक्षण अभियानाअंतर्गत पुढील तीन वर्षांसाठी २० कोटी रुपयांचा निधी विद्यापीठास जाहीर करण्यात आला आहे. त्याअंतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी होलिस्टिक डेव्हलपमेंट सेंटर उभे करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. कुलसचिव डॉ. व्ही. एन शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. महोत्सवाचे समन्वयक डॉ. नितीन कांबळे यांनी स्वागत केले. डॉ. मीना पोतदार यांनी सूत्रसंचालन केले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड यांनी आभार मानले. महोत्सवात ४०० कलाकारांनी सहभाग नोंदवला आहे. यावेळी डॉ. सागर डेळेकर, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. के. एम. गरडकर, डॉ. आसावरी जाधव, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. पांडुरंग पाटील, डॉ. प्रतिभा देसाई, डॉ. एस. टी. कोंबडे, डॉ. व्ही. एस. खंडागळे, डॉ. प्रमोद कसबे उपस्थित होते.

22 FEB 2024
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात घुमला सुगम गायनासह लोकवाद्याचा आवाज

## 'शिवस्पंदन' महोत्सवाचे जल्लोषात उद्‌घाटन



शिवस्पंदन महोत्सवात बुधवारी विद्यार्थिनींनी समूहगीत सादर केले.

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** सुगम गायन, एकल लोकवाद्य वादन आणि समूहगीतांनी बुधवारी शिवाजी विद्यापीठात रंगत आणली. निमित्त होते शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्यावतीने आयोजित तीन दिवसीय शिवस्पंदन महोत्सवाचे.

या महोत्सवाचे उदघाटन प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले. वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित होते. दिवसभरात सुगम गायन, एकल लोकवाद्य वादन आणि समूहगीत स्पर्धा झाल्या. यातून विद्यार्थ्यांनी पारंपरिक लोकवाद्यातून कलागुणांचे दर्शन घडविले. तत्पूर्वी, सकाळी ९ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारुढ पुतळ्यापासून वि. स. खांडेकर भाषा भवनापर्यंत ढोल-ताशांच्या गजरात शोभायात्रा काढण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते शोभायात्रेचे उद्‌घाटन करण्यात आले.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, विद्यापीठाला कल्चरल पॉवरहाऊस बनविण्याचे धोरण आपण अंगीकारले आहे. त्यादृष्टीने शिवस्पंदनसारखा महोत्सव अत्यंत उपयुक्त ठरेल.

डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले, कला ही जीवनावश्यक बाब आहे. मनावरील तणाव दूर करण्यासाठी कलासाधना आवश्यक असते. विद्यार्थ्यांनी स्पर्धा म्हणून नव्हे, तर स्वानंदासाठी शिवस्पंदनमध्ये मनापासून सादरीकरण करावे. डॉ. नितीन कांबळे यांनी स्वागत केले. डॉ. मीना पोतदार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रकाश गायकवाड यांनी आभार मानले.

### महोत्सवात आज : मूकनाट्य, नकला व लघुनाटिका

शिवस्पंदन महोत्सवाच्या उद्‌घाटन सत्रानंतर बुधवारी दिवसभरात सुगम गायन, एकल लोकवाद्य वादन आणि समूहगीत स्पर्धा झाल्या. या महोत्सवामध्ये आज, गुरुवारी मूकनाट्य, नकला आणि लघुनाटिका सादर होतील. हे सर्व कार्यक्रम वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात सकाळी १० वाजल्यापासून सादर होणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 FEB 2024
सकाळ




कोल्हापूर : डी. डी. शिंदे सरकार कॉलेजमधील तनिषा नलवडे, अभिमन्यू पाटील यांना सर्वोत्कृष्ट विद्यार्थी म्हणून शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

# तनिषा नलवडे, अभिमन्यू पाटील ठरले 'सर्वोत्कृष्ट विद्यार्थी'

**कोल्हापूर :** येथील डी. डी. शिंदे सरकार कॉलेज (वरिष्ठ) मधील विद्यार्थी अभिमन्यू पाटील, तर कनिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थिनी तनिषा लुमाकांत नलवडे यांचा सर्वोत्कृष्ट विद्यार्थी म्हणून सन्मान करण्यात आला. त्यांना शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रशस्तिपत्र प्रदान करण्यात आले. २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील सर्वोत्कृष्ट विद्यार्थी म्हणून अभिमन्यू आणि तनिषा यांची निवड करण्यात आली. विविध क्रीडा, एनसीसी, शैक्षणिक आणि इतर विभागांत प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमुख उपस्थितांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कॉलेजच्या अध्यक्षा माधुरी शिंदे, उपाध्यक्ष प्रथमेश शिंदे, सचिव डॉ. नीळकंठ शिंदे, खजिनदार डॉ. शिवाजीराव देशमुख, विश्वस्त डॉ. विलास पोवार, अतुल बोंद्रे, प्राचार्य डॉ. बी. डी. गिरीगोसावी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन समन्वयक प्रा. डॉ. ए. बी. पाटील यांनी केले.

22 FEB 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# केंद्राच्या निधीचा विद्यापीठाच्या सर्वांगीण विकासासाठी विनियोग

## कुलगुरू डॉ. शिर्के

कोल्हापूर, ता.२० (प्रतिनिधी)

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने प्रधानमंत्री उच्चतर शिक्षण अभियान अर्थात पीएम-उषा या योजनेअंतर्गत शिवाजी विद्यापीठास जाहीर केलेल्या २० कोटी रुपयांच्या निधीचा विनियोग विहीत सुविधांची निर्मिती व सर्वांगीण विकासासाठी उत्तम पद्धतीने करण्यात येईल, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी येथे दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते जम्मू (जम्मू आणि काश्मीर) येथून केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानाच्या अंतर्गत विविध राज्यांतील विद्यापीठे आणि शिक्षण संस्थांना ७८ योजनांसाठी ३६०० कोटींहून अधिक निधीची घोषणा करण्यात आली. त्यामध्ये विद्यापीठे सक्षमीकरण निधी योजनेअंतर्गत शिवाजी विद्यापीठास २० कोटी रुपयांचा निधी जाहीर करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे शिवाजी विद्यापीठ सहभागी झाले. त्या निमित्ताने राजर्षी शाहू सभागृहात उपस्थितांना संबोधित करताना कुलगुरू डॉ. शिर्के बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने यापूर्वी शिवाजी विद्यापीठास राष्ट्रीय उच्चतर शिक्षण अभियानाच्या पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यामध्ये भरीव निधी दिला. शैक्षणिक, संशोधकीय पायाभूत सुविधा विकास, नवोपक्रम, नवसंशोधन आणि वेगळे उपक्रम यांसाठी त्या निधीचा विद्यापीठाने अतिशय योग्य प्रकारे विनियोग केला. यामुळे आता प्रधानमंत्री उच्चतर शिक्षण अभियानांतर्गत विद्यापीठे सक्षमीकरण योजनेसाठी हजारहून अधिक विद्यापीठांचे प्रस्ताव दाखल झाले असताना त्यातील अवघ्या ५८ विद्यापीठांची निवड करण्यात आली, त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाचा समावेश करण्यात आला आहे.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी प्रधानमंत्री उच्चतर शिक्षण अभियानाच्या अनुषंगाने उपस्थितांना अवगत केले. पायाभूत सुविधा विकासासह संशोधन, पेटंट, बौद्धिक संपदा हक्क, उद्योजकता विकास, कौशल्य विकास, स्टार्टअप, नवोपक्रम, नवसंशोधन इत्यादी बाबींसाठी आवश्यक निधी देऊन विद्यापीठांना सक्षम करण्याचे धोरण केंद्र सरकारने स्वीकारले आहे. त्याच धोरणाचा एक महत्त्वाचा भाग म्हणून शिवाजी विद्यापीठाची या योजनेसाठी निवड करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 FEB 2024
लोकमत

# शिवाजी विद्यापीठात उद्यापासून परिसंवाद

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामधील संख्याशास्त्र विभागामध्ये उद्या, शुक्रवारी आणि शनिवारी (दि. २४) 'वास्तविक समस्यांचे सांख्यिकीय अन्वेषण' या विषयावरील दोन दिवसीय परिसंबादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या परिसंवादाचे उद्घाटन कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संख्याशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. अनिल गोरे, डॉ. आनंद करंदीकर, प्रा. डॉ. आर. एन. रटिहळ्ळी यांच्या उपस्थितीत होणार असल्याची माहिती विभागप्रमुख प्रा. डॉ. शशीभूषण महाडिक यांनी दिली.

संख्याशास्त्र विषयाच्या अध्यापनामध्ये येणाऱ्या अडचणी, नावीन्यता आणि उपाययोजना, तसेच नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार झालेल्या बदलाला सामोरे जाताना शिक्षकांना अध्यापनामध्ये करावे लागणारे बदल, यावर चर्चा होणार आहे.

22 FEB 2024 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# योगातील नवे आयाम जगासमोर यावेत

## आचार्य हेमंत खेडेकर: शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय परिषद

■ सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे आयोजित राष्ट्रीय योग व निसर्गोपचार परिषदेचे उद्‌घाटन आचार्य हेमंत खेडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शेजारी आर. जी. पवार, शरद बनसोडे, यशोधन बोकील उपस्थित होते.

कोल्हापूर, ता. २१ : 'योग व निसर्गोपचार ही विनाऔषधी व भारताची समृद्ध उपचार पद्धती आहे. या पद्धतीचा म्हणावा तितका प्रसार देशात झाला नाही. न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया आदी देशांमध्ये अनेक निसर्गोपचार केंद्र सुरू झाली असून भारतात अद्यापही ही उपचार पद्धती बाल्यावस्थेत आहे. म्हणूनच या क्षेत्रातील नवे आयाम जगासमोर येणे आवश्यक आहे', असे मत आचार्य, मर्मयोगी हेमंत खेडेकर यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे आयोजित राष्ट्रीय योग व निसर्गोपचार परिषदेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. मानव्यशास्त्र विभागाच्या सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी क्रीडा अधिविभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे होते. आचार्य खेडेकर यांनी 'मर्मचिकित्सा' या नव्या आयामाची माहिती दिली. डॉ. बनसोडे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी राजेंद्र जाधव, अरविंद पालके, उदय घाटे आदी उपस्थित होते. आजीवन अध्ययन व विस्तार विभागप्रमुख डॉ. आर. जी. पवार यांनी स्वागत केले. एम. ए. योगशास्त्राचे सहायक प्राध्यापक कानिफनाथ पंढरे यांनी पाहुण्याचा परिचय करून दिली. टी. आर. गुरव यांनी सूत्रसंचालन केले. यशोधन बोकील यांनी आभार मानले. दरम्यान, दोन दिवसीय या परिषदेत निसर्गोपचार, योग, स्पोर्टस् मसाज, प्राणिक हिलर, उद्योजकता विकास अशा अनेक विषयावर देश-विदेशातील तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 FEB 2024
लोकमत

# निसर्गोपचारातील नवे आयाम जगासमोर येणे आवश्यक

कोल्हापूर : योग व निसर्गोपचार ही विनाऔषधी व भारताची समृद्ध उपचार पद्धती आहे. या पद्धतीचा म्हणावा तितका प्रसार देशात झाला नाही. न्यूझीलंड, ऑस्ट्रेलियामध्ये अनेक निसर्गोपचार केंद्र सुरू झाली असून, भारतात अद्यापही ही उपचार पद्धती बाल्यावस्थेत आहे. त्यामुळे या क्षेत्रातील नवे आयाम जगासमोर येणे आवश्यक, असे मत आचार्य, मर्मयोगी हेमंत खेडेकर यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने आयोजित राष्ट्रीय योग व निसर्गोपचार परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. मानव्यशास्त्र विभाग सभागृहात होणाऱ्या परिषदेच्या अध्यक्षस्थानी डॉ. शरद बनसोडे हे होते.

डॉ. आर. जी. पवार यांनी स्वागत केले. कानिफनाथ पंढरे यांनी परिचय करून दिला. यशोधन बोकील यांनी आभार मानले. यावेळी राजेंद्र जाधव, अरविंद पालके, उदय घाटे, आदी उपस्थित होते. टी. आर. गुरव यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 FEB 2024
तरुण भारत

# निसर्गोपचाराचे नवे आयाम समोर येण्याची गरज : आचार्य हेमंत खेडेकर

कोल्हापूर : योग व निसर्गोपचार ही विनाऔषधी व भारताची समृध्द उपचार पद्धती आहे. या पद्धतीचा म्हणावा तितका प्रसार देशात झाला नाही. न्यूझिलंड ऑस्ट्रेलिया देशामध्ये अनेक निसर्गोपचार केंद्र सुरु झाली असून भारतात अद्यापही ही उपचार पद्धती बालअवस्थेत आहे. म्हणूनच या क्षेत्रातील नवे आयाम जगासमोर येणे आवश्यक, असे मत आचार्य, मर्मयोगी हेमंत खेडेकर यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने आयोजित राष्ट्रीय योग व निसर्गोपचार परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. मानव्यशास्त्र सभागृहात राष्ट्रीय परिषदेच्या अध्यक्षस्थानी डॉ. शरद बनसोडे होते. आचार्य खेडेकर यांनी मर्मचिकित्सा या नव्या आयामाची सविस्तर माहिती दिली. डॉ. शरद बनसोडे यांनी परिषदेला शुभेच्छा दिल्या. स्वागत विभागप्रमुख डॉ. आर. जी. पवार (संचालक) यांनी केले. पाहुण्याचा परिचय कानिफनाथ पंढरे यांनी करुन दिला. यशोधन बोकील यांनी आभार मानले. सूत्रसंचालन टी. आर. गुरव यांनी केले. यावेळी राजेंद्र जाधव, अरविंद पालके, उदय घाटे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 FEB 2024
पुढारी

# निसर्गोपचार पद्धतीचा प्रसार होण्याची गरज : खेडेकर

कोल्हापूर : योग व निसर्गोपचार ही विनाऔषधी व भारताची समृद्ध उपचार पद्धती आहे. याच्या देशांतर्गत प्रसाराची गरज आहे, असे प्रतिपादन आचार्य हेमंत खेडेकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने आयोजित राष्ट्रीय योग व निसर्गोपचार परिषदेच्या उद्‍घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया देशांमध्ये अनेक निसर्गोपचार केंद्रे सुरू झाली असून, भारतात अद्याप ही उपचार पद्धती बाल्यावस्थेत आहे. म्हणूनच या क्षेत्रातील नवे आयाम जगासमोर येणे आवश्यक आहे, असे खेडेकर म्हणाले. परिषदेत निसर्गोपचार, योग, स्पोर्टस् मसाज, प्राणिक हिलर, उद्योजकता विकास अशा अनेक विषयांवर देश-विदेशातील तज्ञ व्यक्ती मार्गदर्शन करणार आहेत. स्वागत विभागप्रमुख डॉ. आर. जी. पवार (संचालक) यांनी केले. सूत्रसंचालन टी. आर. गुरव यांनी केले. यशोधन बोकील यांनी आभार मानले. यावेळी राजेंद्र जाधव, अरविंद पालके, उदय घाटे, योग व निसर्गोपचाराचे विद्यार्थी, अभ्यासक, तज्ज्ञ मार्गदर्शक उपस्थित होते.

22 FEB 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गोखले कॉलेजमध्ये संख्याशास्त्रीय पध्दतीवरील कार्यशाळा

कोल्हापूर, ता. २१ : गोखले महाविद्यालयातील मानसशास्त्र व राज्यशास्त्र विभागातर्फे शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय योजना न्यू कॉलेज क्लस्टरअंतर्गत 'सामाजिक शास्त्रातील संख्याशास्त्रीय पध्दती'वर कार्यशाळा झाली. प्राचार्य डॉ. आर. बी. भुयेकर, प्रा. डॉ. आर. पी. आढाव यांच्या हस्ते रोपाला पाणी घालून उद्घाटन झाले. प्रा. ए. एम. गाईंगडे यांनी प्रास्ताविक केले.

प्रथम सत्रात डॉ. सुरेश संकपाळ यांनी सामाजिक शास्त्रातील विविध संख्याशास्त्रीय पध्दतीची ओळख करुन दिली. द्वितीय सत्रात प्रा. डॉ. निलेश सुस्वरे यांनी संशोधनातील संख्याशास्त्राचे महत्व सांगितले. तृतीय सत्रात प्रा. डॉ. अनिल बलुंगडे यांनी संशोधनातील विविध पाय-या आणि संख्याशास्त्रीय पध्दतीषयी माहिती दिली. प्राचार्य डॉ. भुयेकर यांच्या हस्ते उपस्थितांना प्रमाणपत्रे वितरित केली. विविध महाविद्यालयांतील ६० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. प्रा. जयकुमार देसाई, प्रा. डॉ. मंजिरी मोरे, दौलत देसाई यांचे मार्गदर्शन लाभले.